**प्रेसनोट दिनांक २५/०७/२०१९**

**अडीच वर्षाची मुलीस आईचे ताब्यात सुखरूप दिले.**

**बंडगार्डन पोलीस स्टेशन**

---

बंडगार्डन पोलीस स्टेशन अंकित ताडीवाला रोड पोलीस चौकीमध्ये सहा.पोलीस निरीक्षक,अमोल काळे, पोलीस उप-निरीक्षक,ठोंबरे व पोहवा.चरापले हे कर्तव्य करीत असताना महिला रेणू सोहराम परिहार या पोलीस चौकीत आल्या व त्यांनी सांगितले माझी अडीच वर्षाची मुलगी नामे अबनी सोहराम परिहार भाजी मंडई स्वच्छतागृहाचे बाजुला माझे सोबत होती. भाजी मंडईतीलगर्दीतचुकामुक झाली तेथे शोधघेतला पण मिळाली नाही. सदर महिलेकडे मुलीचा फोटो नव्हता. मुलीचे व तिचे अंगावरचेकपडयाचे वर्णन सहा.पोलीसनिरीक्षक श्री काळे यांनीघेतले व त्या वर्णनावरून मुलीचा शोधघेणेबाबत पोलीस उप-निरीक्षक ठोंबरे व पोहवा. चरापले यांना सांगितले. पोलीसउप-निरीक्षक ठोंबरे व पोहवा. चरापले हे सदर मुलीचा ताडीवाला रोड परिसरात शोधघेत असताना, प्रायव्हेट रोड येथेएकाघरासमोर सदर मुलगी रडत असताना मिळून आली. एक महिला तिला शांतकरत होती. मुलीस नीटसे बोलताही येत नव्हते. सहा.पोलीसनिरीक्षक श्री काळे यांनीदिलेल्या वर्णनाप्रमाणे मुलगी मिळून आल्याने,  सदर महिलेकडे विचारपूस करता ही मुलगी येथील नाही असेत्यांनी सांगितले. हरविलेली मुलगी ही, अबनी सोहराम परिहार असल्याचे लक्षात येताच, तिलाताब्यातघेवूनताडीवाला रोड पोलीसचौकीत आणले. चौकीत मुलीने आईला पाहताच, मुलगी आईकडे झेपावली. सदर महिलेच्या डोळयात आनंदाश्रू आले. मुलगी सुखरूप मिळाली. सदर महिलेने पोलीसांचे आभार मानले

सदरची चांगली कामगिरी बंडगार्डन पोलीस स्टेशनकडीलताडीवाला पोलीसचौकीचेसहा.पोलीसनिरीक्षक अमोल काळे, पोलीस उप-निरीक्षकठोंबरे, पोहवा चरापले यांनीकेली आहे.

**वरिष्ठ पोलीस निरीक्षक,**

**बंडगार्डन पोलीस स्टेशन पुणे**

